# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अधिसूचना :**

क्रमांकः२अ/एडीएम/२०११/प्रमाणपत्रे/३५२५
दिनांक : ५ जानेवारी २०११

**विषय : शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत.**

व्यावसायिक पदविका, पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा प्रवेश अर्ज सादर करतेवेळी शासन नियमानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने शै. वर्ष २०११-१२मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी तसेच १० वी व १२ वी नंतरच्या पदविका, एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्मसी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांस केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावीत. संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.

- **जात प्रमाणपत्र (Caste Certificate) :सर्व मागासवर्गीय उमेदवारांना सर्व अभ्यासक्रमासाठी लागू :**

  महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रामध्ये **मायग्रेशन**, अथवा जात **महाराष्ट्राबाहेरील राज्यातील** आहे असे नमूद केलेली जात प्रमाणपत्र मागासवर्गीय उमेदवार म्हणून प्रवेशासाठी **ग्राहय धरली जाणार नाहीत**. अशी प्रमाणपत्रे सादर करून प्रवेश घेतल्यास कोणत्याही टप्प्यावर सदर उमेदवाराचा **प्रवेश रद्द करण्यात येईल** व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील या बाबीची नोंद घ्यावी.

- **नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र : (Non-Creamy Layer Certificate) :**

  महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००८/प्र.क्र.६९७/मावक-५, दि.१३ जानेवारी,२००९ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त VJ/DT(A)/NT(B)/NT(C) /NT(D)/OBC/SBC या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले

दि.३१/०३/२०१२ पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अभ्यासक्रमासाठी लागू राहील.

- **जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) :**

  महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात वैधता प्रमाणपत्र पदविका अभ्यासक्रमाव्यतिरीक्त उपरोक्त नमूद केलेल्या सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी लागू राहील.

- **महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) :**

  महाराष्ट्र राज्यातील सर्व उमेदवारांना महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

तसेच शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांस प्रवेश घेणाऱ्या सर्व उमेदवारांना ''**भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्र** (Indian Nationality Certificate)'' सादर करणे बंधनकारक आहे.

**प्रवेशाबाबतची इतर सर्व माहिती या संचालनालयाच्या www.dte.org.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. अधिक माहितीकरीता या संचालनालयाच्या ३०२३३४४/४५/४६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.**

सही/-

(डॉ. सु. का. महाजन)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई